## प्रसिध्दी पत्रक

दिनांक : १४/०६/२०२३

**लोकसेवक नागराज वसंतराव जोशी, वय ५० वर्षे पद सचिव सेवा सोसायटी नंदनवन कंधार यांनी बे–बाकी प्रमाणत्रासाठी २०००/–रुपयाची लाचेची मागणी करुन १००/–रुपयाची लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांने जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.उस्माननगर गुरन ००८९/२०२३ कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दि. १३/०६/२०२३ रोजी २०.२३ वा. स्टे.डा.नोंद नं. ३५ |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | श्री नागराज वसंतराव जोशी वय ५० वर्षे, व्यवसाय –सरकारी नोकरी पद सचिव सेवा सोसायटी नंदनवन ता.कंधार जि. नांदेड. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २०००/– रुपये व ५००/– रूपये |
| लाच स्विकारली रक्कम | १००/– रुपये लाच मागणी करुन ती स्विकारली |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना त्यांचे मौजे नंदनवन येथील शेतजमिनीवर पीक कर्ज घ्यावयाचे होते म्हणुन ते आय.सी.आय.सी. बँक नांदेड येथे कर्ज मागणीसाठी गेले असता आय.सी.आय.सी. बँकेने त्यांना विविध बँका व सोसायटी यांचे कडील बे–बाकी प्रमाणपत्र देण्यास कळविले. दिनांक ०९/०६/२०२३ रोजी मौ.नंदनवन येथील सवा सहकारी संस्था मर्यादित संस्थेचे सचिव आलोसे जोशी यांना तक्रारदार भेटले. तक्रारदार यांनी संस्थेचे बे–बाकी प्रमाणपत्र मागितले असता आलोसे यांनी २०००/–रुपयाची मागणी केली. दिनांक १२/०६/२०२३ रोजी आलोसे यांना तक्रारदार यांने बे–बाकी प्रमाणपत्रा बाबत फोन वर विचारले असता आलोसे यांनी ५००/–रुपये दया असे सांगितले. तक्रारदार यांना संबंधीत लोकसेवकास लाच दयायची नव्हती म्हणुन अँन्टीकरप्शन ब्युरो नांदेड येथे तक्रार दिली. त्यावरुन आलोसे यांची लाचमागणी पडताळणी दोन पंचा समक्ष केली असता आलोसे यांनी तक्रारदार यानां १००/–रुपयाची मागणी करुन सातबारा आणवयास सांगितले तक्रारदार सातबारा घेवुन गेले असता आलोसे नंदनवन गावातुन निघुन गेले होते. आज रोजी त्यांना पैसे देण्यास तक्रारदार गेले असता त्यांनी १००/–रुपये स्विकारले व तक्रारदार यांनी पैसे दिल्याची पावती मागितली असता आलोसे यांनी याची कोणतीही पावती नसते तुम्हाला पावती देणार नाही असे कळविले व रुपये १००/– रुपये लाच म्हणुन स्विकारले |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक,यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक श्री गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, पाहेकॉ/किशन चितोरे, पोना/राजेश राठोड, पोकॉ/अरशद खान, चापोहेकॉ/मारोती सोनटक्के सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | श्री गजानन बोडके , पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड हे करीत आहे |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की , भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड** | |
| **संपर्क कमांक :– 02462–253512**<br>**टोल फी कमांक– 1064** | **ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net** |
| **मा. पोलीस अधीक्षक 9623999944** | **पोलीस उपअधीक्षक 7350197197** |
| **ई–मेल आयडी**<br>spacbnanded@gmail.com | dyspacbnanded@gmail.com |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

(राजेंद्र पाटील)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner